# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६ ) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

**(परीक्षा व मुल्यमापन मंडळ)**


**एम.आय.डि.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली – ४४२६०५**

**E-mail:** director.boee@unigug.ac.in


जा.क्र./गोंवीग/पवमुम/1151/२०२३ दिनांक: 19/०६/२०२३

प्रति,

**मा. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**मा. विभागप्रमुख, विद्यापीठाचे पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

विषय:– विद्यार्थ्यांचे Academic Bank of Credits (ABC) ID तयार करण्याबाबत.

संदर्भ:– मा. उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार कक्ष क्र. ४१८, महा. शासन यांचे पत्र जा क्र. एनईपी–२०२२/प्र.क्र.०९/विशि–३ दि. ०६/०६/२०२३

**महोदय,**

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये तसेच विद्यापीठाचे पदव्युत्तर शैक्षणिक विभाग यांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ मधील मुद्दा क्र. ७ नुसार शैक्षणिक श्रेयाक पतपेढी (Academic Banks of Credits) ची सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये परिणामकारक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने सर्व विद्यार्थ्यांची प्रवेशाच्यावेळी न चुकता एबीसी पोर्टलवर नोंदणी करण्यात यावी असे कळविण्यात आलेले आहे.

करिता आपणांस विनंती करण्यात येते की, सर्व विद्यार्थ्यांची प्रवेशाच्यावेळी न चुकता एबीसी **Academic Bank of Credits** पोर्टलवर नोंदणी करण्यात यावी व तसा कार्यवाहीचा अहवाल संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ या कार्यालयास सादर करण्यात यावा.

19/6/23

संचालक (प्र.)

परिक्षा व मुल्यमापन मंडळ

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी माहीतीस:–

१) मा. कुलगुरू महोदयांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

२) मा. प्र. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक ४१८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र.०२२-२२७९३१७१ Email ID:- vishi3-hted@mah.gov.in

क्रमांक:- एनईपी- २०२२/प्र.क्र.०९/विशि-३ दिनांक:- ०६ जून. २०२३

प्रति,

कुलगुरु,
सर्व अकृषि विद्यापीठे,

विषय- शैक्षणिक अभ्यासक्रम श्रेयांक आराखड्याची सन २०२३-२४ पासून अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ- समक्रमांकित शासन निर्णय दिनांक २०.०४.२०२३ व दिनांक १६.०५.२०२३

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित शासननिर्णयान्वये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक अभ्यासक्रम व श्रेयांक आराखड्यासंदर्भात निर्देश जारी करण्यात आले असून, त्याबाबतच्या अंमलबजावणीच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सदर प्रकरणी, सुकाणू समितीने शासनास सादर केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने आपणास खालीलप्रमाणे कळविण्याचे मला आदेश आहेत:-

१. दि.१६.०५.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी दिलेल्या निर्देशांचे अनिवार्यरित्या अंमलबजावणी करण्यात यावी.

२. दि.२०.०४.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षासाठी दिलेल्या निर्देशांची विद्यापीठसतरावर, स्वायत्त महाविद्यालयांमध्ये तसेच नॅकचे अ, अ+, अ++ मानांकन असेलेल्या अस्वायत्त संलग्नित महाविद्यालयांमध्ये अनिवार्यरित्या अंमलबजावणी करण्यात यावी. इतर अस्वायत्त संलग्नित महाविद्यालयांना या निर्देशांची सन २०२३-२४ पासून अंमलबजावणी करण्यासाठी विद्यापीठामार्फत कालबद्ध पर्याय देण्यात यावा.

३. विद्यापीठांनी अस्वायत्त संलग्नित महाविद्यालयांसाठी या पर्यायानुसार तात्काळ कालबद्ध कार्यक्रम तयार करुन अशा महाविद्यालयांना अंमलबजावणीच्या सूचना देण्यात याव्या.

४. जी अस्वायत्त संलग्नित महाविद्यालये शासन निर्णय दि.२०.०४.२०२३ च्या निर्देशांची अंमलबजावणी करतील अशा महाविद्यालयांसाठी परीक्षा व्यवस्थेसाठी (Examination System) समूह किंवा तत्सम यंत्रणा विद्यापीठ तयार करु शकेल.

५. विद्यापीठांची शैक्षणिक प्राधिकरणे आणि स्वायत्त महाविद्यालये यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रसारीत केलेल्या राष्ट्रीय उच्च शैक्षणिक आराखडा (NHEQF) नुसार परिणाम आधारीत अभ्यासक्रम विकसित करावा.

६. संपुर्ण राज्यात एकसमान शैक्षणिक वेळापत्रक असण्याच्या दृष्टीने सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी पहिल्या वर्षाचा पदवी अभ्यासक्रम दि.०१ जुलै ते १५ जुलै, २०२३ पर्यंत सुरु करावा. दुस-या व तिस-या वर्षाचा पदवी अभ्यासक्रम आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम दि.०१ ऑगस्ट, २०२३ पासून सुरु करण्यात यावा.

७. शैक्षणिक श्रेयांक पतपेढी (Academic Bank of Credit) ची सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये परिणामकारक अंमबजावणी होणाच्या दृष्टीने सर्व विद्यार्थ्यांची प्रवेशाच्यावेळी न चुकता एबीसी पोर्टलवर नोंदणी करण्यात यावी.

आपला,

(अशोक शं.मांडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

GADO VISHI-३\D Pravin\p २०२३\CR २०२२- NEP २०२० Committee सुकाणू समिती.docx